2077/16

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय
८३, धर्मादाय आयुक्त भवन,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई - ४०००१८

11 APR 2016

विषय : कार्यालयीन कामकाजासाठी शासकीय ई-मेलचा वापर करणेबाबत

वाचा: १. मा. प्रधान सचिव (मातं), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, यांचे अ.शा.प.क्र.GAD-मातंसं ०७२/३/२०१४-O/O DIT, दिनांक ३०/०९/२०१३
२. विधी व न्याय विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१४/प्र.क्र.५०/का.०७ दिनांक २२/०९/२०१४

कार्यालयीन परिपत्रक क्रमांक ४५८ दिनांक ११/०४/२०१६

महाराष्ट्र राज्य ई-गर्व्हनन्सचे धोरण २०११ तसेच ई-मेल धोरण, महाराष्ट्र राज्य, दिनांक १ मार्च, २०१३ अन्वये शासकीय कामकाजाकरीता माहितीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तसेच सार्वजनिक अभिलेख अधिनियम १९९३ च्या कलम ४ नुसार शासकीय ई-मेल आय डी चा वापर करणे आवश्यक आहे.

तरी सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शासकीय कामकाजाकरीता शासकीय ई-मेल आय.डी. चा वापर करण्यात यावा. सर्व ई-मेल धारकांनी त्यांचे विभागास आलेला ई-मेल दररोज तपासावा व विभागाच्या ई-मेल आय.डी. वरुन ई-मेल पाठवावा.

पुढे असे निदर्शनास आले आहे की, ज्या विभागाकडे वा कर्मचाऱ्यांकडे ईमेल आय.डी. असताना देखील सदर कर्मचारी संगणक शाखेकडे ई-मेल करण्याकरीता तगादा करीत असतात, तरी यापुढे सर्व ई-मेल धारकांनी आपल्या विभागाचा ई-मेल त्यांच्या विभागाच्या आय.डी. वरुन करावा.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालयीन कामकाजासाठी शासकीय ई-मेलचा
वापर करणेबाबत

**महाराष्ट्र शासन,**
विधी व न्याय विभाग,
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.५०/का.०७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
**दिनांक :- २२ सप्टेंबर,२०१४**

वाचा:- मा.प्रधान सचिव (मातं), माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग यांचे
अ.शा.प.क्र.GAD -मातंसं०७२/३/२०१४-O/O DIT, दि.३०.९.२०१३

**शासन परिपत्रक** :

शासकीय कामकाजात शासकीय ई-मेलचा वापर करण्याच्या सूचना माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्या दि.३०.९.२०१३ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये देण्यात आलेल्या होत्या.(सोबत प्रत जोडली आहे)

तथापि, विभागाच्या अधिनस्त असलेली काही जिल्हा न्यायालये/ कार्यालये तसेच विभागातील काही कार्यासने यांच्याकडून शासकीय कामकाजाकरीता g-mail/yahoo mail/ Hotmail/ rediffmail चा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र राज्य ई-गर्व्हनन्सचे धोरण-२०११ तसेच ई-मेल धोरण, महाराष्ट्र राज्य, दि.१ मार्च २०१३ अन्वये शासकीय कामकाजाकरीता माहितीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तसेच सार्वजनिक अभिलेख अधिनियम १९९३ च्या कलम ४ नुसार "**शासकीय ई मेल आय डी**" चा वापर करणे आवश्यक आहे.

तरी सदर परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, शासकीय कामकाजाकरीता **शासकीय ई मेल आय डी**चा वापर करण्यात यावा. तसेच आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

( लो.स.मुजर )
**उप सचिव**

**प्रति,**

१) महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई,
२) महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३) सहयोगी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई,